स.के.नं. ३०३/२०१३
नि.क्र. २२/क

अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.१ याची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | - | रुपाली मोहन मोकल |
| वय | - | ३९ वर्षे |
| व्यवसाय | - | वकीली |
| राहणार | - | घर नं. ८६५ ब, मुळेखंड, ता. उरण, जि. रायगड |

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती पवार यांच्याद्वारे**

१. घटना ही दि. २५/०५/२०१३ रोजी मुळेखंड येथे आमचे राहते घरी घडली होती. ती घटना संध्याकाळी ६.४० च्या सुमारास घडली होती. त्यादिवशी माझे आई वडिल माझे चुलत मावशीचा ७५ वा वाढदिवस असल्याने रेवदंडा येथे गेले होते. त्यांचे सोबत माझी चुलत बहिण वंदना कक्कड हि सुद्धा होती. ते संध्याकाळी ६.३० च्या सुमारास उरण येथे वापस आले. आमचे चहापाणी होऊन माझे चुलत बहिणीला सोडण्यासाठी आम्ही गेटवर गेलो. गेटवर सोडून घरी येत असताना आरोपी विमल व अश्वीनी यांनी आम्हाला पाहताच अश्लील शिविगाळ करुन दगड फेक करण्यास सुरुवात केली. ती आमच्याकडे पाहून बोलावयास लागली 'रांडांणू तुमची पाहुणी येऊन बरोबर जातात. आमची पाहुणी आली की, तुमच्या नजरा लागतात, तुमचे लग्न होणार नाही, उरणचे रिक्षावाले तुमच्या गांडीत दांड घासतील, त्यांच्याकडून एकीकीचे हातपाय तोडून घेईन,' अशी त्यांनी धमकी दिली. त्या दगडफेक करत असल्याने मी माझे मोबाईलवर त्यांचा फोटो काढावयास गेली असता, विमल हिने मारलेला एक दगड माझ्या उजव्या दंडावर लागला. ती बोलली की, 'तुम्ही फोटो काढले तरी मी घाबरत नाही, तुम्हाला काय करायचे ते करुन घ्या.' त्यानंतर माझे वडिल पोलीस ठाण्यात फिर्याद देण्यास गेलो. तेव्हा पोलीसांनी दवाखान्यात जाण्याचे

पत्र दिले. त्यानुसार आम्ही उरण येथील सरकारी दवाखान्यात गेलो. तेथे माझेवर उपचार केले. त्यानंतर मी पुन्हा पोलीस ठाण्यात तक्रार देण्यास गेले. त्यावेळी अपघाताच्या प्रकरणात पोलीस पोस्टमार्टन करीता व्यस्त होते. त्यामुळे रात्री ९.०० वाजेपर्यंत देखील फिर्याद न घेतल्याने मी घरी वापस आले. त्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी पुन्हा आम्ही पोलीस ठाण्यात गेलो. तेव्हा देखील पोलीस हजर नव्हते. त्यानंतर रात्री ९.०० ते १०.०० वाजताच्या सुमारास पोलीसांनी आमची फिर्याद घेतली. त्यानंतर आम्ही घरी आल्यावर आमचे घरी पोलीस आले व घटनास्थळ पाहून त्यांनी आणलेल्या पंचांसमक्ष पंचनामा केला. आता मला मी दाखल केलेली फिर्याद दाखविली. त्यावर माझी सही असून मजकूर बरोबर आहे, करीता फिर्यादला **निशाणी क्र. P1/PW1** देण्यात येत आहे. आता मला प्रथम खबर दाखविली. त्यावर माझी सही असून मजकूर बरोबर आहे, करीता प्रथम खबरीला **निशाणी क्र. P2/PW1** देण्यात येत आहे. आरोपीने ज्या दगडाने मला मारले, तो दगड दाखविल्यास मी ओळखू शकतो. आम्ही पोलीसांना आमच्याकडे लावलेल्या सी.सी.टीव्ही चे फुटेज मोझर बेअर कंपनीच्या सी.डी.मध्ये दिले होते. तसेच माझे मोबाईल फोन मधुन काढलेले तीन फोटो मी पोलीसांना दिले होते. तसेच पुरावा कायदयाच्या कलम ६५ब चे प्रमाणपत्र सुद्धा दिले होते. ते प्रमाणपत्र मी आमच्या घरच्या संगणकावरुन ते फुटेज व मोबाईल वरील घेतलेले फोटो घरच्या प्रींटर वरुन काढून घेतल्याबाबत दिले होते. मला संगणक हाताळणीची माहिती आहे. ते फोटो व फुटेज घेतले त्यावेळी संगणक चालू स्थीतीत होते. आता मला ते प्रमाणपत्र दाखविले. त्यावर माझी सही असून मजकूर बरोबर आहे, करीता सदर प्रमाणपत्राला **निशाणी क्र. P3/PW1** देण्यात येत आहे. त्या सीडी मधील फुटेज दाखविल्यास मी ओळखू शकते. आता मला मुद्देमाल क्र. १३/२०१७ वरील कागदात गुंडाळून सील असलेला दगड त्यावरील सील न्यायालया समक्ष काढून दाखविला. आरोपीने मला मारलेला दगड हाच आहे, करीता सदर दगडाला **भौतिक वस्तू क्र. अ** देण्यात येत आहे.

२. आता मला प्रकरणात दाखल सी.डी. न्यायालयातील लॅपटॉपवर चालऊन दाखविली असता, त्यामध्ये 192.168.1.10_8000_01_20130525181409_7346296.mp4 व 192.168.1.10_8000_03_20130525182508_7845281.mp4 अशा दोन फाईल मिळून आल्या.

**न्यायालयातील संगणकावर सदर व्हीडीओ चालविण्यासाठीचे सॉफ्टवेअर चालू नसल्याने सरतपास पुढील तारेखपर्यंत तहकुब.**

श्रवणोत्तर स्विकृत

सही/-

उरण, (एस.पी. वानखडे )

दिनांक – ०४/०३/२०२६ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग,न्यायालय क्र.२ उरण